Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक १७ ] गुरुवार ते बुधवार, एप्रिल २३-२९, २०२६/वैशाख ३-९, शके १९४८ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ३०.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक–नागपूर विभागीय पुरवणी

### अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क, यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-६ |
| **भाग एक-अ.—**(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-१० |


## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २३२.

### प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, यांजकडून

**संदर्भ :-** (१) महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०२४-प्र.क्र.९०-का. ६, दिनांक २६ जुलै, २०२४ रोजीचे पत्र.

(२) मा. प्रबंधक (निरीक्षण-१), उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई ४०० ०३२ यांचे क्रमांक (जन)-१००१-२०२४-१४०४, दिनांक ६ ऑगस्ट, २०२४ रोजीचे पत्र.

(३) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार -अ, वित्त विभाग यांचे दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजीची अधिसूचना.

**नागपूर न्यायीक जिल्ह्यातील प्रबंधक, लघुलेखक (ग्रेड-१) व अधीक्षक यांना राजपत्रित वर्ग-२ चा दर्जा प्राप्त असल्याबाबतची अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करण्याबाबत.**

**अधिसूचना**

क्रमांक-बी-४(१)-१३८२-२०२६.—

उपरोक्त संदर्भाकित विषयाचे अनुषंगाने संदर्भ क्रमांक (१) चे शासन निर्णयान्वये व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे संदर्भ क्रमांक (२) चे पत्रान्वये महाराष्ट्र राज्यातील दुय्यम न्यायालयातील कार्यरत लघुलेखक (ग्रेड-१) यांना राजपत्रित वर्ग २ चा दर्जा असल्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

तसेच, संदर्भ क्रमांक (३) मधील पृष्ठ क्रमांक १६९ वर (१३) विधि व न्याय विभाग या शिर्षाखाली नमूद ४ जिल्हा न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय (ग्रामीण) या मथळ्याखाली राजपत्रित या तक्त्यामध्ये अ. क्र. ९ आणि ११ वर अनुक्रमे प्रबंधक, जिल्हा न्यायालय आणि अधीक्षक, जिल्हा न्यायालय या पदनामांचा समावेश दर्शविलेला आहे.

त्या अनुषंगाने, नागपूर न्यायिक जिल्ह्यात कार्यरत खालील तक्त्यात नमूद प्रबंधक, लघुलेखक (ग्रेड-१) व अधीक्षक यांना राजपत्रित वर्ग - २ चा दर्जा असल्याबाबतची अधिसूचना खालील प्रमाणे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**तक्ता**

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | **प्रबंधक** | |
| १ | श्रीमती एस. एस. राऊत | प्रबंधक |
| २ | श्री. एस. डब्ल्यु. कोलते | प्रबंधक |
| | **लघुलेखक ग्रेड-१** | |
| १ | श्री. व्ही. एन. गणोरकर | लघुलेखक ग्रेड- १ |
| २ | श्री. पी. यु. किटे | लघुलेखक ग्रेड- १ |
| ३ | श्रीमती एम. आर. येलवटकर | लघुलेखक ग्रेड-१ |
| ४ | श्रीमती एम. आर. अत्रे | लघुलेखक ग्रेड-१ |
| ५ | श्री. एन. डी. लांजेवार | लघुलेखक ग्रेड- १ |
| ६ | श्री. ए. एन. वाघमारे | लघुलेखक ग्रेड- १ |
| ७ | श्री. पी. के. तांबे | लघुलेखक ग्रेड- १ |
| ८ | श्री. पी. बी. पाटील | लघुलेखक ग्रेड- १ |
| ९ | श्री. पी. पी. येनूरकर | लघुलेखक ग्रेड- १ |
| १० | श्री. आर. जी. इंगोले | लघुलेखक ग्रेड- १ |
| ११ | श्री. आर. व्ही. नेमाडे | लघुलेखक ग्रेड- १ |
| १२ | श्री. एस. आर. पारपल्लीवार | लघुलेखक ग्रेड- १ |
| १३ | श्री. शेख मुझफ्फर अहमद शेख नवाब | लघुलेखक ग्रेड- १ |
| १४ | श्रीमती एस. आर. चापले | लघुलेखक ग्रेड- १ |
| १५ | श्री. ए. पी. बोथे | लघुलेखक ग्रेड- १ |
| १६ | श्रीमती व्ही. एम. वासनिक | लघुलेखक ग्रेड- १ |
| १७ | श्री. व्ही. एन. सवाईमून | लघुलेखक ग्रेड- १ |
| १८ | कु. एस. एन. वानखेडे (सौ. एस. आर. बले) | लघुलेखक ग्रेड- १ |

**तक्ता**–चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| १९ | सौ. एस. एस. राजहंस | लघुलेखक ग्रेड- १ |
| २० | श्रीमती एन. एन. मंथनवार | लघुलेखक ग्रेड- १ |
| २१ | श्री. एम. एन. केशपागे | लघुलेखक ग्रेड- १ |
| २२ | कु. जी. ए. जोशी | लघुलेखक ग्रेड- १ |
| २३ | श्रीमती के. डी. हरडे | लघुलेखक ग्रेड- १ |
| २४ | श्री. आर. बी. बुरडे | लघुलेखक ग्रेड- १ |
| २५ | श्री. एस. एम. लिखितकर | लघुलेखक ग्रेड- १ |
| २६ | कु. व्ही. एस. नरेडवार | लघुलेखक ग्रेड- १ |
| २७ | श्री. आय. जी. सोनकुसरे | लघुलेखक ग्रेड- १ |
| २८ | श्रीमती के. एम. बालपांडे | लघुलेखक ग्रेड- १ |
| २९ | सौ. पी. एन. जामठे | लघुलेखक ग्रेड- १ |
| ३० | श्रीमती ए. जे. चिचाटे | लघुलेखक ग्रेड- १ |
| ३१ | सौ. एस. डी. कारेमोरे | लघुलेखक ग्रेड- १ |
| ३२ | कु. व्ही. जी. इखे / श्रीमती व्ही. एस. बोहरपी | लघुलेखक ग्रेड- १ |
| ३३ | सौ. बी. पी. चिंचाळकर | लघुलेखक ग्रेड- १ |
| ३४ | श्रीमती पी. ए. भोयर / श्रीमती पी. आर. गवांदे | लघुलेखक ग्रेड- १ |
| ३५ | श्रीमती डी. टी. विघ्ने | लघुलेखक ग्रेड- १ |
| ३६ | श्री. एस. के. आवंडकर | लघुलेखक ग्रेड- १ |
| ३७ | श्री. पी. आर. मुंगळे | लघुलेखक ग्रेड- १ |
| | **अधीक्षक** | |
| १ | श्री. जी. आर. दुबे | अधीक्षक |
| २ | श्री. ए. एम. कोतेवार | अधीक्षक |
| ३ | श्री. एन. पी. उरकुडे | अधीक्षक |
| ४ | श्रीमती ए. एम. जोशी | अधीक्षक |
| ५ | श्री. जे. के. तिवारी | अधीक्षक |
| ६ | श्री. व्ही. बी. देवीकर | अधीक्षक |
| ७ | श्री. व्ही. पी. खसाळे | अधीक्षक |
| ८ | श्री. ए. एम. गव्हाळे | अधीक्षक |
| ९ | श्रीमती सी. एम. खापरे | अधीक्षक |
| १० | श्री. एल. जी. साखळकर | अधीक्षक |
| ११ | श्री. ए. आर. पाचोडे | अधीक्षक |

नागपूर :
दिनांक ७ एप्रिल, २०२६.

**डी. पी. सुराणा**,
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर.

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २३३.

## जिल्हाधिकारी, यांजकडून

### भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम १९(१) खालील अधिसूचना

क्रमांक- सहा.मह.अधि.-उपजि. (भु.) विपाविमक्र.२-कावि- ७२-२०२६.—

ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या भंडारा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अधिसूचना क्रमांक २४३ अन्वये दिनांक २७ नोव्हेंबर, २०२५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता असण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटलेली आहे,

आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ क्रमांक-२, भंडारा यांना पदनिर्देशित करित आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक ८-एलक्युएन-२०२४-२५, मौजा- कच्चेखणी, ता. पवनी, जि. भंडारा.

| अनुक्रमांक | शेतमालकाचे नाव | भूमापन क्रमांक | संपादनाखालील जमिनीचे क्षेत्र |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | | हे. आर |
| १ | हरिहर नारायण रायपूरकर, गिरिधर नारायण रायपूरकर, शकुंतला नारायण रायपूरकर, खुशाल राजू सहारे | ६५/१ | १ ५१ |
| | | एकूण गट १ . . | १ ५१ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | : | गोसीखुर्द प्रकल्प. |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | : | मौजा खापरी /रेहपाडे गावाच्या पुनर्वसनाकरिता. |
| समाजाला मिळणारे लाभ | : | गोसेखुर्द प्रकल्पा अंतर्गत मौजा खापरी/रेहपाडे या बाधित गावठाणाकरिता मौजा कच्चेखणी येथील लागणारी १.५१ हे. आर जमीन संपादनाकरिता |

**अनुसूची-तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

सदर भूसंपादित जमिनीमुळे बाधित व्यक्ती विस्थापित होत नसल्यामुळे विस्थापन करण्याची आवश्यकता नाही.

**अनुसूची-चार**

**सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश**

कार्यकारी अभियंता, गोसीखुर्द पुनर्वसन विभागीय पथक, नागपूर यांचे कार्यालयीन जावक पत्र क्र. ४४४१-तां.शा-गोपुविप-खापरी (रेह) - २०२४, दिनांक २७ ऑक्टोबर, २०२५ नुसार भूसंपादन अधिनियम, २०१३ अंतर्गत मौजा कच्चेखानी येथील जमिनीचा प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहे. तसेच त्यांचे जावक क्र. ४६०५-ता.शा- ५-गोपुविप-२०२५, दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२५ चे पत्रान्वये गोसीखुर्द प्रकल्पाकरीता प्राप्त पर्यावरण विभागाची मान्यता आदेश क्र. No.-7-84EN 5 -IA, दिनांक ३ फेब्रुवारी, १९८८ अन्वये बुडीत क्षेत्र तसेच, लाभक्षेत्रातील कामे (उपसा सिंचन, जल सिंचन सुविधा निर्माण करण्याकरीता कालवे, वितरीका इत्यादी) या सर्वांसाठी प्राप्त झालेली आहे व विभागाने पर्यावरण मंजुरी आदेशातील सर्व अटींची पूर्तता करून निर्देशाचे अनुपालन केलेले आहे. त्यामुळे सदरील प्रकरणात अधिनियमाचे प्रकरण २ व ३ नुसार आवश्यक असणारी तरतुदी व सामाजिक आघात मूल्य निर्धारण या मधून सुट प्राप्त झालेली आहे व नव्याने सामाजिक आधार मूल्यनिर्धारण करण्याची आवश्यकता नाही, याबाबत संपादनाखालील क्षेत्र व बाधित खातेदार याबाबत प्रत्यक्ष मौक्यावर स्थल पाहणी करून खात्री करण्यात आलेली आहे.

**अनुसूची-पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | :- | प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही. |
| (ब) | प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता | :- | - निरंक - |
| (क) | ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे, त्या अधिसूचनेचा तपशील | :- | - निरंक - |

**टीप :-** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ क्रमांक-२, भंडारा यांचे कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

भंडारा :
दिनांक १८ मार्च, २०२६.

**सावन कुमार** (भा.प्र.से),
जिल्हाधिकारी, भंडारा.

---

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २३४.

**जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, यांजकडून**

**वाचा** : (१) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचे कडील अधिसूचना क्रमांक एस. व्ही. सी. आर. ४३२३-स-४-९४, दिनांक २२ सप्टेंबर, १९९४.

(२) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८-प्र क्र. १३-मातंक, मुंबई-४००००१, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९.

(३) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक गाजप्र-२०१९-प्र क्र. १३६-पंरा-४, मुंबई-४००००१, दिनांक २१ जानेवारी, २०२०.

(४) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचे कडील परिपत्रक क्र. गावठाण-ड्रोन सर्व्हे-SOP-प्र क्र. १४२-२०२०, दिनांक २३ नोव्हेंबर, २०२०.

(५) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचे कडील परिपत्रक क्र. गावठाण-ड्रोन सर्व्हे-प्र क्र. ३९ २०२१, दिनांक २५ जानेवारी, २०२१.

**संदर्भ** : उप अधीक्षक भूमि अभिलेख, सिंदेवाही यांचेकडील क्र.-आस्था-परिरक्षण प्रस्ताव-मौजा-चारगाव बडगे-कावि-२०२६, सिंदेवाही, दिनांक १६ मार्च, २०२६.

**अधिसूचना**

क्रमांक स्वामित्व-अधिसूचना-मौजा-चारगाव बडगे -का.वि. २४५-२७४-२०२६.—

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्रमांक १०९३-प्र.क्र.१९-ल-१, दिनांक १८ ऑगस्ट, १९९४ चे शासन निर्णया नुसार भूमि अभिलेख विभागाची तालुका स्तरावर पुनर्रचना करणेत आलेली आहे. त्या अनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचे कडील अधिसूचना क्र.-एसव्हीसीआर-४३२३-स-४-९४, दिनांक २२ सप्टेंबर, १९९४ अन्वये नागपूर विभागातील साजांची पुनर्रचना करणेत आली असून साजांची गावे व मिळकती कायम करणेत आलेल्या आहेत.

स्वामित्व योजनेअंतर्गत ड्रोनव्दारे गावठाण भूमापन झालेल्या मौजा- चारगाव बडगे (५४१०३३), ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर या गावचे ड्रोनव्दारे गावठाण भूमापन करण्याचे काम सर्व्हे ऑफ इंडियाकडून पूर्ण करण्यात आले आहे. तसेच, चौकशी काम पूर्ण होवून आखिव पत्रिका व सनदा तयार झाल्यामुळे उप अधीक्षक, भूमि अभिलेख, सिंदेवाही यांचे अधिनस्त साजा- सिंदेवाही मध्ये मौजा- चारगाव बडगे (५४१०३३), ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर हे गाव नव्याने समाविष्ट करून त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येवून परिरक्षणास घेणेस याव्दारे मंजूरी देणेत येत आहे.

सदर अधिसूचनेची अंमलबजावणी दिनांक २३ मार्च, २०२६ पासून होणेची आहे. तसेच, सदर गावाची सनद फी रक्कम रूपये १,०४,२९०/- (अक्षरी रुपये- एक लाख, चार हजार, दोनशे नव्वद फक्त ) ची त्वरीत वसुली करण्यात यावी.

———

भाग १ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १७.

**वाचा** : (१) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचे कडील अधिसूचना क्रमांक एस. व्ही. सी. आर. ४३२३ स-४-९४, दिनांक २२ सप्टेंबर, १९९४.

(२) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१८-प्र क्र. १३-मातंक, मुंबई-४००००१, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९.

(३) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक गाजप्र-२०१९-प्र क्र. १३६-पंरा-४, मुंबई-४००००१, दिनांक २१ जानेवारी, २०२०.

(४) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण-ड्रोन सर्व्हे-SOP-प्र क्र. १४२-२०२०, दिनांक २३ नोव्हेंबर, २०२०.

(५) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण-ड्रोन सर्व्हे-प्र क्र. ३९-२०२१, दिनांक २५ जानेवारी, २०२१.

**संदर्भ** : उप अधीक्षक, भूमि अभिलेख, राजुरा यांचेकडील क्रमांक-नगर भूमापन-ड्रोन सर्व्हे-परिरक्षण प्रस्ताव-२०२६, दिनांक १७ मार्च, २०२६.

**अधिसूचना**

क्रमांक स्वामित्व-अधिसूचना-मौजा पाचगाव-का.वि. २४४-२७५-२०२६.—

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्रमांक १०९३-प्र.क्र.१९-ल-१, दिनांक १८ ऑगस्ट, १९९४ चे शासन निर्णया नुसार भूमि अभिलेख विभागाची तालुका स्तरावर पुनर्रचना करणेत आलेली आहे. त्या अनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म. राज्य), पुणे यांचे कडील अधिसूचना क्र.-एसव्हीसीआर-४३२३-स-४-९४, दिनांक २२ सप्टेंबर, १९९४ अन्वये नागपूर विभागातील साजांची पुनर्रचना करणेत आली असून साजांची गावे व मिळकती कायम करणेत आलेल्या आहेत.

स्वामित्व योजनेअंतर्गत ड्रोनव्दारे गावठाण भूमापन झालेल्या मौजा- पाचगाव (५४१८४२), ता. राजुरा, जि. चंद्रपूर या गावचे ड्रोनव्दारे गावठाण भूमापन करण्याचे काम सर्व्हे ऑफ इंडियाकडून पूर्ण करण्यात आले आहे. तसेच, चौकशी काम पूर्ण होवून आखिव पत्रिका व सनदा तयार झाल्यामुळे उप अधीक्षक, भूमि अभिलेख, राजुरा यांचे अधिनस्त साजा-राजुरा मध्ये मौजा- पाचगाव (५४१८४२) ता. राजुरा, जि. चंद्रपूर हे गाव नव्याने समाविष्ट करून त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येवून परिरक्षणास घेणेस याव्दारे मंजुरी देणेत येत आहे.

सदर अधिसूचनेची अंमलबजावणी दिनांक २० मार्च, २०२६ पासून होणेची आहे. तसेच सदर गावाची सनद फी रक्कम रूपये १,७३,५०५/- (अक्षरी रुपये :- एक लाख, त्र्याहत्तर हजार, पाचशे पाच फक्त) ची त्वरीत वसुली करण्यात यावी.

**प्रदिप जगताप,**
जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख,
चंद्रपूर.

चंद्रपूर :
दिनांक २० मार्च, २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.